बुधवार दि.५ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१४१ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


# सनसनाटी करून प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न;५९ दिवसांपासून मीडिया ट्रायल सुरू

## धनंजय मुंडे यांनी अंजली दमानियांचे आरोप फेटाळले

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मुंबई (वृत्तसंस्था)**

अंजली दमानिया यांनी माझ्यावर केलेले सर्व आरोप खोटे आहेत. हे केवळ त्यांच्या स्वभावाप्रमाणे सनसनाटी निर्माण करण्यासाठी केले गेले आहेत. कृषी विभागात मी मंत्री असतानाच्या काळात झालेली सर्व खरेदी ही शासन नियमानुसारच झाली असल्याचा दावा धनंजय मुंडे यांनी केला आहे.

सनसनाटी, धादांत खोटे आरोप करायचे आणि स्वतःची प्रसिद्धी मिळवायची, याव्यतिरिक्त याच्यात मला काहीही आढळत नसल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. गेल्या ५९ दिवसापासून माझ्यावर मीडिया ट्रायल चालू आहे. ते का चालू आहे? कोण चालवतेय? हे मला माहिती नाही, असे देखील मुंडे यांनी म्हटले. यावेळी त्यांनी अंजली दमानिया यांचा अंजली बदनामिया असा उल्लेख करत टोला हाणला.

धनंजय मुंडे कृषीमंत्री असताना त्या विभागात मोठा भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. त्यांच्या या आरोपाला मुंडे यांनी सडेतोड उत्तर दिले आहेत. आम्ही शांत बसलो म्हणजे आम्हाला बोलता येत नाही, असा होत नाही. मुख्यमंत्र्यांचे अधिकार हे मुख्यमंत्र्यांना ऐवजी दमानियांना माहित आहे का? असा प्रश्न देखील मुंडे यांनी उपस्थित केला. अंजली दमानिया यांचा खोटेपणा हा केवळ मला बदनाम करण्यासाठी असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अंजली दमानिया यांनी आजपर्यंत केलेले कोणतेच आरोप खरे निघाले नसल्याचेही मुंडे यांनी म्हटले आहे.अंजली दमानिया जेव्हापासून आरोप करतात तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी केलेला एकही आरोप सिद्ध झाला आहे का?



असा प्रश्न देखील धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला आहे. या आधी ज्या नेत्यांवर त्यांनी आरोप केले, त्या नेत्यांकडे जाण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे. असे देखील मुंडे यांनी म्हटले आहे. संतोष देशमुख यांचे आरोपी मारले गेले आहेत, असा दावा देखील दमानिया यांनी केला होता. हा देखील दमानियांचा खोटेपणा होता, असे देखील मुंडे यांनी म्हटले आहे. आरोप करण्याचे काम ज्यांनी केले, त्यांना शुभेच्छा. मात्र, माझे राजकीय आयुष्य मायबाप जनतेवर अवलंबून असल्याचा दावा देखील मुंडे यांनी केला आहे.

मी मंत्री असताना कृषी विभागात जी प्रक्रिया राबवली गेली ती पूर्ण पूर्व मान्यतेनेच राबवली गेली असल्याचा दावा मंत्री धनंजय मुंडे यांनी केला आहे. त्यामध्ये विविध कंपन्यांकडून स्पर्धात्मक दर मागवले गेले होते. त्यात जास्तीत जास्त कंपन्यांनी सहभाग व्हावे म्हणून दोन वेळा निविदा प्रक्रियेला मुदतवाढ देण्यात आली होती. भ्रष्टाचार करायचा असता तर दोन वेळा मुदत वाढ देईल का? असा सवाल मुंडे यांनी उपस्थित केला.बीडमध्ये भयंकर घटना घडली आहे. ही संवेदनशील घटना आहे. या प्रकरणी आरोपींना फासावर लटकवणे आमची जबाबदारी आहे. यातून वाद विवाद नको म्हणून मी गप्प आहे. एक विषय झाला की दुसरा विषय काढला जातोय? काय करायचं? अंजली दमानिया माझ्यावर सातत्याने आरोप करण्याचे काम करत आहेत. त्यांना हे काम ज्यांनी कोणी दिले असेल त्यांना माझ्या शुभेच्छा. मात्र साप साप म्हणून जमीन थोटपणे, मीडियातून सनसनाटी निर्माण करणे आणि एखाद्याच राजकीय आणि सामाजिक आयुष्य संपवणे एवढे सोपे नसते, असे आव्हान देखील मुंडे यांनी दिले आहे.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा गंजगाव येथे सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बिलोली । गौतम गावंडे**

बिलोली तालुक्यातील गंजगाव येथिल जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे शिक्षक शाळेतील विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावे म्हणून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात सांस्कृतिक महोत्सव या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उदघाटन विठ्ठल चंदनकर सर शालेय समितीचे अध्यक्ष उपाध्यक्ष आजी माजी सरपंच यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली तर प्रमुख पाहुणे श्री विठ्ठल चंदनकर शाळा व्यवस्थापन समिती चे अध्यक्ष श्री साईराम बावलगावे उपध्यक्ष श्री करिम शेख पत्रकार वैभव घाटे आदी उपस्थित होते.

या सांस्कृतिक महोत्सवात देशभक्ती वरील गित,लावणी,चित्रपटावरील गिते आश्या मराठी तेंलगु हिंदी गिताचा समावेश होता साक्षरता गित घेवुन विद्यार्थी व पालकाच्या





जिवन चरित्रा वर प्रकाश टाकणा–या गिताचा मोठ्या प्रमाणात समावेश करण्यात आला होता.

या कार्यक्रमात शाळेतील व अंगणवाडीतील सर्वच विद्यार्थ्यांनी हिरहिरीने सहभाग घेतला होता.यावेळी गावातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा आनंद घेतला.

सदरील कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक अनिल रायकंटवार सर मेत्रे सर भांगे सर स्वप्निल सर शितल कंधारे मडम परिश्रम घेवुन विद्यार्थ्यांना नृत्य शिकवले सदरील कार्यक्रमाला सरपंच सौ. सुनिता कनशेटे उपसरपंच रेखा बावलगावे सरपंच प्रतिनिधी हाणमंतराव कनशेटे माजी सरपंच माधवराव घाटे दत्तात्र्य गायकवाड अनिता गंजगावकर माणिकराव बासरे आरिफपाशा पठान सेवक सैलानी शेख शादुल शेख यांच्या सह गावातील प्रतिष्ठीत मंडळी उपस्थित होते कार्यक्रमाचे सुत्रसंचलन जामनोर सर यांनी केले तर आभार मेत्रे सर माणले.

## परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाला उत्साहात सुरुवात

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

परिक्रमा महाविदयालयाच्या वार्षिक स्नहसंमेलनाला मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे. वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन परिक्रमा शैक्षणिक संकुलनाचे अध्यक्ष डॉ. प्रतिभाताई बबनराव पाचपुते, यांच्याहस्ते पार पडले.त्यावेळेस प्रमुख पाहूणे, श्री. वसंत हंकारे सर, परीक्रमा शैक्षनिक संकलनाचे मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री प्रतापसिंह बबनराव पाचपुते , परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे सचिव तसेच श्रीगोंदा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार श्री. विक्रसिंह बबनराव पाचपुते,अतिरिक्त मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.अनिल पुंड व सर्व विभागाचे प्राचार्य, वार्षिक स्नेहसंमेलनाचे अध्यक्ष , व विद्यार्थी सचिव उपस्थित होते.यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यानंतर शैक्षणिक गुणवत्तेत चमकदार



कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा व राष्ट्रीय पातळीवर रोबोट ,AI व projet स्पर्धेत उत्तम कामगिरी केलेल्या विद्यार्थीचा सन्मानचिन्ह व प्रशिस्तीपत्र देउन गुणगौरव करण्यात आला राष्ट्रीय पातळीवरच्या स्पर्धा देशातील नामांकित खखढ संस्था तसेच इतर महाविदयालयात पार पडल्या. तसेच परिक्रमा शैक्षणिक संकुलातील शिक्षकांची झहऊ पूर्ण झालेल्या शिक्षकांचा गुणगौरव करण्यात आला. त्यामध्ये इंजिनिअरींग विभागाचे डॉ. सुधीर दिवेकर, डॉ. हरिश अवचट, डॉ. आरती सूर्यवंशी तंत्रनिकेतनचे डॉ. प्रशांत सूर्यवंशी, फार्मसीचे डॉ. मेघना रायकर यांचा सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच, श्रीगोंदा–नगर विधानसभेचे नवनिर्वाचित आमदार श्री विक्रमसिंह बबनराव पाचपुते यांचा सत्कार समारंभ परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या वतीने करण्यात आला व त्यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. तीन दिवस चालणाऱ्या कार्यक्रमाची सुरुवात रंगतदार सांस्कृतिक कार्यक्रमांनी झाली.विद्यार्थ्यांनी नृत्य,नाट्य, गायन, यांसारख्या विविध कलाप्रकारा मध्ये आपली कला सादर करत प्रेक्षकांची मने जिंकली.संपूर्ण स्नेहसंमेलनाला विद्यार्थ्यासह पालक व शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला.महाविदयालयाच्या प्रशासनाने यशस्वी आयोजनासाठी मेहनत घेतली.

## हरित सेना व इको क्लब अंतर्गत २० रबर रोपट्यांचे वृक्षारोपण



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

दानापूर दि ०४ – ०२ – २०२५ रोज मंगळवार दिपभारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय दानापूर येथे शाळेच्या प्रांगणामध्ये ईको क्लबच्या विद्यार्थ्यांच्या हस्ते वीस रबर वृक्षांची लागवड करण्यात आली ,यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री वाय एस गवळी व इको क्लबचे विभाग प्रमुख श्री आर पी खरात तसेच शाळेचे सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

## परिवर्तन संस्थेच्या वतीने यशवंत विद्यालयात शालेय साहित्य आणि बक्षिस वितरण कार्यक्रम

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लातूर । विष्णू मोहन पोले**

२६ जानेवारी प्रजासत्ताक दिना निमित्त यशवंत विद्यालयात विदयार्थ्यांच्या विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या त्या स्पर्धेत विजयी झालेल्या विद्यार्थ्यांना परिवर्तन संस्थेच्या वतीने बक्षिस वितरण आणि सहभागी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

अहमदपुरातील भारत कॉलनी येथील यशवंत प्राथमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिना निमित्त शाळेतील





विद्यार्थ्याच्यां विविध शालेय स्पर्धा घेण्यात आल्या होत्या या स्पर्धेत प्रथम,व्दितीय,तृतीय आलेल्या संघाना परिवर्तन संस्था सुमठाणा यांच्या वतीने बक्षिसांचे वितरण करण्यात आले.तसेच शाळेतील सर्व २४० विद्यार्थी–विद्यार्थींनीना वही,पेन आणि पेन्शीलचे वाटप करण्यात आले.यशवंत प्राथमिक विद्यालयात पार पडलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक आर.आर.पारशेट्टी होते तर प्रमुख पाहूणे म्हणुन परीवर्तन संस्थेचे सचिव बालाजी शिंदे,बिरादार व्हि.व्ही.मुसळे सर, श्रीमती फड, बंडगिरे, करंजकर,मोरे उपस्थित होते.यावेळी बालाजी शिंदे यांनी विजयी खेळाडूचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या तर स्पर्धेत सहभाग घेतलेल्या परंतु विजयी न झालेल्या खेळाडू विद्यार्थ्यांना खचुन न जाता पुढच्या स्पर्धे करिता अधिक मेहनत घेण्याचा सल्ला दिला.कार्यकमाचे अभार बिरादार व्हि.व्ही.यांनी मानले.यावेळी शाळेतील शेकडो विद्यार्थी–विद्यार्थीनी उपस्थित होते.



जनता हायस्कूल कौठा येथे वार्षिक स्नेहसम्मेलन आयोजीत करण्यात आले होते त्यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष मा.श्री नागोराव देशमुख आझाद ग्रुपचे जिल्हाध्यक्ष प्रभाकर पांडे मुख्याध्यापक मुंडे सर सह सर्व कर्मचारी विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते .(लोकनेता न्युज नेटवर्क कौठा)

## कालवश पार्वतीबाई सोनसळे यांचे निधन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । प्रतिनिधी**

उस्माननगर ता कंधार येथील ग्रामपंचायत सदस्य तथा अ.भा.बौद्ध महासभेचे बौद्धाचार्य अंगुलीकुमार सोनसळे यांच्या मातोश्री जेष्ठ महीला कालवश पार्वतीबाई गोविंदराव सोनसळे यांचे दि.४ फेब्रुवारी रोज मंगळवारी सकाळी ११ वाजताच्या दरम्यान – हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले . त्या ८० वर्षाच्या होत्या . त्यांच्या पार्थिवदेहावर आज दि .५ फेब्रुवारी रोज बुधवार ह्या दिवशी सकाळी १० वाजता उस्माननगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार



आहे.त्यांच्या पश्चात दोन मुल, सुना ,नातू ,नाती असा मोठा परिवार आहे.सिद्धार्थ एज्युकेशन सोसायटी संथलित सम्राट अशोक प्राथमिक शाळेचे अध्यक्ष देवराव सोनसळे यांच्या भावजय तर सम्राट अशोक प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राहुल सोनसळे यांच्या चुलती होत .



महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री व सहकार मंत्री अहमदपूर शिरूर चे भूमिपुत्र आमदार बाबासाहेब पाटील यांचा सत्कार करते वेळेस प्रा.प्रवीण बिरादार, राहुल कांबळे.(लोकनेता न्यूज नेटवर्क, माहूर)

## संपादकीय..

# माती जपली नाही, तर



लोकनेता न्यूज नेटवर्क

भारतात शेती हा अजूनही बहुतांश लोकांच्या उपजीविकेचा स्रोत आहे. १.७८ दशलक्ष चौरस किलोमीटर क्षेत्रामध्ये पसरलेल्या जगातील दुसऱ्या क्रमांकाच्या कृषी प्रणालीचा आधार आहे. मातीची धूप होण्याची गंभीर समस्या धान्य उत्पादनावरच परिणाम करत नाही, तर हवामान बदलाच्या युगात अनेक समस्यांचे मूळ बनत आहे. त्यात प्रामुख्याने पर्यावरणीय असंतुलनाचा समावेश होतो.

माती किंवा जमिनीच्या वर उपलब्ध असलेले सैल आणि मऊ घटक बियाणे अंकुरित करतात, मुळे फुटतात आणि झाडे आणि पिके वाढवतात ही आपल्या पृथ्वीवरील जीवनाची प्रातिनिधिक ओळख आहे. आजच्या युगात, आठ अब्ज लोकांसाठी अन्न उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी बिघडत चाललेल्या परिसंस्थेचा समतोल राखणे आवश्यक आहे. हवामान संकट मोठ्या प्रमाणात कमी करण्यासाठी झाडे आणि पिके हा एक मजबूत सक्षमकर्ता आहे; परंतु आज निसर्गाचे अस्तित्व, स्थिर आणि जंगम आणि प्राण्यांसाठी पोषक माती गंभीर धोक्यात आहे. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप केवळ कृषी उत्पादन आणि अन्न सुरक्षेवर परिणाम करत नाही, तर हवामान बदलाची समस्या अधिक व्यापक आणि जटिल बनवत आहे. मातीचा ऱ्हास, उत्पादन क्षमतेत घट आणि आधुनिक कृषी पद्धतींमुळे या समस्येची व्याप्ती दिवसेंदिवस नवीन क्षेत्रांमध्ये पसरत आहे. 'नॅशनल ब्यूरो ऑफ सॉईल सर्व्हे'नुसार, भारतातील सुमारे एक तृतीयांश माती म्हणजे सुमारे १२० दशलक्ष हेक्टर मातीची धूप झाली. तिचा एक महत्त्वपूर्ण भाग सागरी क्षारीकरणामुळे प्रभावित झाला आहे. भारतातील बहुतेक राज्ये मातीची धूप होण्यामुळे प्रभावित आहेत. पंजाब, हरियाणा, गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा सर्वाधिक प्रभावित झाले आहेत. मोठ्या प्रमाणावर मातीची धूप होत असूनही, तंत्रज्ञानावर आधारित शेतीमुळे अन्न उत्पादनात वाढ झाली आहे. भारत आता कृषी उत्पादनाचा दुसरा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. अन्नधान्य उत्पादनात स्वयंपूर्ण आहे; परंतु कुपोषण ही अजूनही एक गंभीर समस्या आहे. पुराच्या वेळी मोठ्या प्रमाणावर मातीची धूप आणि बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात जमिनीचा वापर, रासायनिक खतांच्या मोठ्या प्रमाणावर वापरामुळे क्षारता जमा होणे, वाढती आंलता आणि पाणी साचणे इत्यादींमुळे शेतीयोग्य जमिनीचा मोठा भाग नापीक होत आहे; परंतु मातीची अशीच झीज होत राहिल्यास, येत्या काही वर्षांमध्ये अन्न आयात करावे लागेल.

जगातील केवळ २.४ टक्के भूभाग असलेला भारत जगाच्या १८ टक्के लोकसंख्येला अन्न पुरवतो. अनियंत्रित शेती व्यतिरिक्त, मातीची धूप होण्याची प्रमुख कारणे म्हणजे मोठ्या प्रमाणावर शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी जमिनीच्या वापरात होणारा व्यापक बदल. त्यात अविवेकी जंगलतोडदेखील समाविष्ट आहे. यासोबतच जनावरांच्या संख्येच्या बाबतीतही भारत हा सर्वात मोठा देश आहे. जनावरे चरताना जमिनीच्या वरच्या वनस्पती थराचा ऱ्हास होतो. वनस्पती काढून टाकल्यामुळे मातीचा वरचा थर कमकुवत होतो आणि पाऊस तसेच वाऱ्यामुळे मातीची धूप होते. भारत हा लोकसंख्येच्या दृष्टीने जगातील सर्वात मोठा देश आहे आणि दीड अब्ज लोकांच्या पोटापाण्यासाठी लागणारे धान्य उत्पादन करण्यासाठी कृषी व्यवस्थेवर सतत दबाव असतो. या सर्वांचा परिणाम संपूर्ण कृषी व्यवस्थेच्या मुळाशी असलेल्या मातीवर होतो. सध्या शेतीमध्ये ९४ टक्के रासायनिक खतांचा वापर केला जातो. रासायनिक कीटकनाशके आणि खतांच्या अतिवापरानेही शेतात आणि पिकांना विषबाधा झाली. भारत हा कीटकनाशकांचा सर्वात मोठा उत्पादक आणि वापरकर्तादेखील आहे. हरितक्रांतीच्या काळात आपले अन्नधान्य उत्पादन ५० दशलक्ष टनांवरून ३०० दशलक्ष टनांपर्यंत वाढले; परंतु हे यश सुपीक मातीची किंमत मोजून मिळालेले दिसते. अशा परिस्थितीत, जलद मातीचा नाश भारताच्या वाढत्या लोकसंख्येसाठी अन्नसुरक्षेचे गंभीर संकट निर्माण करू शकते. मातीची धूप झाल्यामुळे जमिनीची उत्पादकता कमी होतेच; पण नैसर्गिकरीत्या जमिनीत असलेल्या कार्बनचे प्रमाण कमी झाल्यामुळे पाणी शोषून घेण्याची आणि धरून ठेवण्याची क्षमताही मोठ्या प्रमाणात कमी होते. परिणामी, पाऊस आणि इतर स्त्रोतांमधून पाण्याचे पुनर्भरणदेखील लक्षणीय प्रमाणात कमी होते. त्यामुळे भारतातील भूजल पातळी मोठ्या प्रमाणात कमी होते.

कृषी–आधारित अर्थव्यवस्था भारताचे जागतिक आर्थिक चढ–उतारांपासून संरक्षण करते, म्हणूनच गेल्या काही दशकांमध्ये आलेल्या मोठ्या जागतिक मंदीच्या काळातही भारतीय अर्थव्यवस्थेवर फारसा परिणाम न होता वेगाने वाढ होत राहिली. एकूणच, असे म्हणता येईल की मातीची धूप 'डोमिनो इफेक्ट' आहे. त्यामुळे नैसर्गिक, सामाजिक आणि आर्थिक प्रक्रियांवर नकारात्मक परिणाम होतो. हे स्पष्ट आहे की आजच्या काळात माती हे सर्वात महत्त्वाचे संसाधन आहे. भारतासारख्या देशासाठी ती केवळ पोट भरण्यासाठी आवश्यक नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्थेचा आधार आहे. अशा परिस्थितीत, नैसर्गिक पद्धतीने जमिनीची सुपीकता परत आणण्याची गरज आहे. त्यासाठी आपल्याला मातीचे भौतिक, रासायनिक आणि जैविक आरोग्य पुनर्संचयित करावे लागेल. सध्या, वापरल्या जात असलेल्या एकूण खतांपैकी फक्त सहा टक्के ही सेंद्रिय स्त्रोतांची खते आहेत. त्यामुळे रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून सेंद्रिय खतांवर आधारित शेतीला प्रोत्साहन देण्याची गरज आहे; मात्र यामध्ये धान्य उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. भारत हा केवळ कृषीप्रधान देश नाही, तर समृद्ध निसर्ग–केंद्रित कृषी परंपरादेखील आहे. ती मातीची क्षमता, हवामान, पाण्याची उपलब्धता यांच्या सुसंवादावर आधारित आहे. ती पुनरुज्जीवित झाल्यास माती, पाणी आणि हवेची गुणवत्ता पुन्हा रुळावर आणली जाऊ शकते; पण त्यासाठी माती, पाणी आणि सार्वजनिक आरोग्य केंद्रस्थानी ठेवून आणि शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन धोरणे आखावी लागतील. त्यासाठी वैज्ञानिक विचारांची, तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्याची आणि प्रबळ राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. गेल्या काही दशकांमध्ये, सरकारी पातळीवर केलेले प्रयत्न हे केवळ कृषी उत्पादन आणि त्याच्या आर्थिक पैलूंवरच राहिले आहेत. मातीचे आरोग्य हा शेतकऱ्यांच्या अजेंड्यावरचा विषय दिसत नाही, हे अलीकडच्या काही शेतकरी आंदोलनांच्या मागणीवरून समजू शकते. मातीची स्थिती बिघडण्याच्या जटिल समस्येवर कोणताही सोपा उपाय नाही आणि माती आणि पाण्याची समस्या आमच्या शेतातून भोजन थाळीपर्यंत पोहोचली आहे. अशा परिस्थितीत या भीषण समस्येची दखल घेऊन शासन, समाज आणि वैयक्तिक पातळीवर प्रयत्न करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

# निसर्ग प्रेमी कवयित्री सौ प्रिया कुलकर्णी यांच्या स्मृतिगंध या कवितासंग्रहाचे प्रकाशन

लोकनेता न्यूज नेटवर्क

एज्युकेशन सोसायटी नायगाव संचलित माई विचार प्रतिष्ठानच्या वतीने कै.कलावतीबाई बळवंतराव चव्हाण व्याख्यानमाला या नुकत्याच संपन्न झालेल्या कार्यक्रमात खा. प्रा. रवींद्र पाटील चव्हाण,प्रसिद्ध कवी नारायण पुरी,जिजाऊ ब्रिगेडच्या माजी प्रदेशाध्यक्ष डॉ.रेखाताई चव्हाण यांच्या हस्ते व अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये निसर्गप्रेमी कवयित्री सौ प्रिया शरदराव कुलकर्णी यांचा स्मृतिगंध या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले.



प्रकाशित झालेल्या स्मृतीगंध यामधील अनेक कविता निसर्गावर दिसून येतात तेव्हा कवियत्री हे निसर्गप्रेमी आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही,एकीकडे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात कत्तल होते सरकार यावर ठोस निर्णय घेत नाही आणि आम्हाला भविष्यात एका मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे हे उदयाचे विदारक दृश्य कवियत्री सौ प्रिया कुलकर्णी यांच्या प्रकाशित झालेल्या स्मृतिगंध हा कवितासंग्रहातील कवियत्री यांना असे दिसून येत असेल म्हणून त्या वसंत ऋतू या कवितेत सांगतात...

येतो मोहर आंब्याला गहू कोवळा आला, कोवळ्या उन्हात डोलला सुंदर वाटे ते नयनाला.

कवियत्रीच्या नयनाला निसर्ग किती सुंदर वाटतो म्हणून लहानपणापासून ते मोठ्या पर्यंत ग्रामीण भागातील मातीत निसर्गाचे धन कसे उगवते म्हणून त्या माझ्या मातीचे कौतुक या कवितेत लिहितात...

रानमेवा मिळेल तो फक्त माझ्या गावाकडच्या मातीत, चिंचा बोरे पेरू शेंगा मस्त मिटके मारुनी खात,


गावाकडील रानमेव्याची आठवण झाली की आपल्या तोंडाला पाणी आपोआप सुटते आणि बालपणीच्या आठवणीही पुढे येतात... अनेकांच्या जीवनात प्रेम नकळत येतं मनातील आपल्या भावना आपल्या सजनाला सांगावं वाटतात भाव मनीचे या कवितेत बोलकं कवियत्री प्रिया कुलकर्णी यांनी केलेला आहे त्या कोणाला काय वाटेल ते सांगतात...

वाटते कधी थेंबाला आपणही बरसावे, चिंब चिंब भिजुणी धरणीच्या कुशीत जावे,
मातीस ही कधी वाटते आसमंती धुंद दरवळावे,
चिंब भिजुणी दवा मध्ये नवचैतन्याचे अंकुर फुलवावे,...
वाऱ्यासही कधी वाटते गिरका घेऊन उंच नभा जावे,
बेधुंद होऊनी दरी कपारी गंधित फुलासवे दरवळावे...
वाटते कधी पाषाणाला आपणही उंच पहाडी जावे, उंचावरूनही पाहता वसुंधरेचे नवचैतन्याचे रूप पहावे...

यावरून स्वामी विवेकानंदाचे निसर्गावरील प्रेम आणि अण्णाभाऊ साठे यांचे निसर्गावरील वर्णन हे कवियत्री सौ कुलकर्णी यांनी हाताळले असावे म्हणून त्या पहाट वारा या कवितेत आपण अनुभवलेला गुलाबी थंडीचा आणि धुक्याचा नजारा कवितेत शब्दबद्ध करतात,

अलवार आला थंड पहाट वारा, नवचैतन्याने भरला आसमंत सारा, गुलाबी थंडीने तनुस येई शहारा ,धुक्याने सुंदर दिसे सारा नजारा.....

अनेकांच्या जीवनी असे काही प्रसंग येतात की शब्द ओठातून ते बाहेर पडतात आणि




एक नाते तयार होते, म्हणून कवियत्री मनस्पर्श या कवितेत मांडतात

मी गुणगुणले शब्द तुझे अन शब्दातून ओघळले गाणे,
नकळत वाऱ्यावरती उमटत राहिले तराणे,
हृदयातुनी मी तार छेडले सारे, समजले भाव तुला अबोलपणे नकळत सारे,केव्हा कधी जुळले तुझे माझे नामे मनस्पर्शाने......

आज जग हाप हापलेले दिसते धनाची माया कमावण्यासाठी माणूस वाटेल त्या थराला जात आहे तर काहीजण त्याचे परिणाम देखील भोगत आहेत पण कष्टाशिवाय कोणाचं खाऊ नये हे राष्ट्रसंत गाडगेबाबा यांनी सांगितले व थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी देखील आपल्या आजरावर साहित्यात साहित्य संपदा रेखाटलेली दिसून येते,तोच अनमोल विचार काव्यपुष्पातून कवयित्री सौ.कुलकर्णी ह्या कष्टाची भाकर या कवितेतून कष्टाच्या भाकरीचे मोल प्रगट करताना दिसून येते.

कष्टाची भाकर वाटे सुखकर सुखाचा घास भरवीत, स्मित हास्य चेहऱ्यावर घेऊनी डोक्यावरती पदर राबते सुगरण चुली समोर...

विविध व्यवसायासाठी, नोकरीसाठी गाव सोडून शहरात आल्यानंतर चार पैसा कमावता येते पण गावाकडील भाकरीची चव कुठेच मिळेना हे कवियत्रीनी विसरलेलं नाही. गावाकडील आपल्या माय माऊली लक्ष्मीचा मोठेपणा करीत त्यापुढे म्हणतात.

ना तिला कशाचे भान,सुखान भरलं सार अंगण,खरोखर समाधानी आहे गावाकडचे जन जीवन.....

एखादी प्रेमिका एखाद्या प्रियकरावर जिवापाड प्रेम करताना त्या प्रियकराकडे काय अपेक्षा करते हे प्रियकरा विषयीचे शब्द आपल्या अधीरल्या नयनात या कवितेत शब्द कवियत्री गुंफतात.

तुझे नी माझे प्रेम जसे शिंपल्यात मोती तुझ्याविना मी अधुरी सख्या रे या जगती.

तुझ्याविना मी अधुरी आहे अशी प्रेयसी सांगते आणि पुढे प्रियकराकडूनही अपेक्षा करते,

देशील ना तु साथ मला, गाशील ना तु माझ्या सवे, तुझ्या नी माझ्या प्रेमाचे रंग बरसू जगी या रोज नवे..... अशा निसर्ग आणि प्रेम या अधोरेखित वर भरलेली स्मृतीगंध हा कवितासंग्रह कवयित्री सौ प्रिया शरदराव कुलकर्णी यांनी वाचक प्रेमीच्या हाती देत आहे या काव्यसंग्रहात एकूण कविता १९ आहेत काही कविता छोट्या आहेत पण त्या कवितेतला भाव मोठा आहे सहज आणि सोप्या भाषेतील सौ.प्रिया कुलकर्णी यांच्या कविता वाचक प्रेमींना निश्चितच आवडतील तर काहीजणासाठी प्रेरणादायी ठरतील कवयित्री सौ प्रिया कुलकर्णी यांच्या या पहिल्याच काव्यसंग्रहास व भविष्यातील लिखाणास अगदी मनपूर्वक अनंत शुभेच्छा.....

**–पत्रकार माधव बैलकवाड**
**नायगाव ८०८०४७१६४२**







# दिव्यांगाकडे पाहून जगण्याची ऊर्जा व स्फूर्ती मिळते-अ.मु.अ.संदीप माळोदे

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**मालेगाव । संदीप कदम**



दिव्यांग व्यक्तिमध्ये सामान्य व्यक्ती पेक्षा वेगळी शक्ती असून त्याच्याकडे पाहून जगण्याची ऊर्जा व स्फूर्ती मिळते असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उदघाटन प्रसंगी केले. यावेळी त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या शिक्षक व कर्मचाऱ्यांचे कौतुक देखील केले आहे.

जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागातर्गत जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून ३ फेब्रुवारी रोजी पोलीस कवायत मैदानात दिव्यांगाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे अति. मुख्य कार्यकारी अधिकारी संदिप माळोदे,जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती दलजीत कौर जज,उप मुख्य कार्यकारी अधिकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार,समाज कल्याण विभाग लातूरचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार,समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे,बापू दासरी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत दिव्यांगाच्या अस्थिव्यंग, मतिमंद, मूकबधिर, अंध प्रवर्गातील ७० शाळेतील जवळपास साडे सातशे मुले व मुली सहभागी झाले होते. प्रथमता हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन करून व दिव्यांग मुलांच्या हस्ते मशाल पेटवून या स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी बोधडी येथील अंध विद्यार्थ्यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्यांचे गीत गाऊन स्वागत केले. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र आऊलवार यांनी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग शाळेतील मुख्याध्यापक, अधीक्षक, शिक्षक व कर्मचारी यांच्या विविध समित्या स्थापन केल्या असून वै. सा. का. कैलास मोरे यांच्या मार्गदर्शना खाली दिव्यांग मुला- मुलीच्या निवासाची व भोजनाची चोख व्यवस्था बजावण्यात आली होती. दिनांक ४ फेब्रुवारी रोजी दहा वाजता दिव्यांग विदयार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन कुसुमताई चव्हाण सभागृहात करण्यात आले आहे.

### विकलांगाच्या उन्नती साठी तंत्र ज्ञानाचा वापर करावा-दलजीत कौर जज

**आज काल तंत्रज्ञान दिवासोंदिवस प्रगत होत असून विकलांग मुले मुली जन्मास येऊ नये यासाठी तंत्रज्ञानाची मदत घ्यावी व विकलांग विद्यार्थ्यांच्या उन्नती साठी पालकांनी व शिक्षकांनी तंत्रज्ञानाचा वापर करावा असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती दलजीत कौर जज यांनी दिव्यांग मुलामुलींच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत केले आहे.**

# खानवटे ग्रामस्थांनी वाजत-गाजत श्री संत बाळूमामांच्या पालखीला दिला निरोप

## पालखी सोहळ्यासाठी महिलांची उपस्थिती लक्षणीय

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**



खानवटे (ता.दौंड) येथे गेल्या पाच दिवसापासून श्री संत बाळूमामा यांच्या पालखीचे आगमन झाले होते,गेली पाच दिवस संपूर्ण गावातील ग्रामस्थांनी,महिलांनी आणि तरुण मित्रांनी दररोज संध्याकाळी ७ ते ९ कीर्तन सेवा कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमास खास करून महिलांनी प्रचंड गर्दी केलेली पाहायला मिळाली दररोज आलेल्या भक्तांना सकाळीआणि-संध्याकाळी ५०० किलो अन्नदान ग्रामस्थांनी सामुदायिक नियोजन करून महाप्रसादासाठी दिले होते.

खानवटे गावातील अनेक दानशूर व्यक्तींनी अन्नदानासाठी आणि किर्तन सेवेसाठी या पाच दिवसांमध्ये योगदान दिले.दि.४ रोजी पाच दिवसांच्या सप्ताहाच्या कार्यक्रमाचा समारोप झाला,यावेळी हजारो महिलांनी नाचत- वाजत -गाजत श्री संत बाळूमामाच्या पालखीला आनंदमय वातावरणात फटाक्यांची आतिषबाजी करत संपूर्ण खानवटे गावातुन मिरवणूक काढली.आणि पुढील गावात प्रस्थानासाठी गावाच्या बाहेर वेशीपर्यंत निरोप दिला. यावेळी पाच दिवस संपूर्ण गावातील महिला पुरुष हजारोंचे संख्येने एकत्रित कार्यक्रम साजरा करताना पाहायला मिळाल्याने आज निरोप देताना सर्वांना अश्रू अनावर झालेले पाहायला मिळाले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन तरुण कार्यकर्ते बापूराव नगरे,शरद ढवळे,रामदास चव्हाण,नवनाथ ढवळे,विजय कन्हेरकर, सौरभ भोसले,राहुल पोटफोडे,दत्ता लोखंडे, संभाजी येडे,आण्णासाहेब लोखंडे,शंकर पानसरे,अनंत खरसे,हनुमंत चव्हाण,प्रवीण कोरे, भिमराव पवार,गणेश लोखंडे, ग्रामपंचायत सदस्य वैभव लोखंडे, निवृत्ती ढवळे, संदिप धायतोंडे,मयुर शिरसाट, रामदास धायतोंडे,देविदास ठणके,इत्यादींनी केले होते.मागील पाच दिवस श्री संत बाळूमामांची मेंढरे राखण्याचे काम तुषार नगरे आणि राजेंद्र धायतोंडे यांनी केले. यावेळी महिला,पुरुष,तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नांदेडचे नवे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले अभिजीत राऊत सहआयुक्त जीएसटी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**





सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राहुल कर्डिले यांची नांदेडचे नवे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची छत्रपती संभाजी नगर येथे वस्तू व सेवा कर सहआयुक्त पदावर बदली झाली आहे. मंगळवारी सायंकाळी सामान्य प्रशासन विभागाने सनदी अधिकाऱ्यांच्या बदली जाहीर केल्या. यामध्ये सन २०१५ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी असणारे राहुल कर्डिले यांची नांदेड जिल्हाधिकारी पदी नियुक्ती झाली आहे. त्यांनी यापूर्वी अमरावती सहाय्यक जिल्हाधिकारी ,परभणी सहाय्यक जिल्हाधिकारी, चंद्रपूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,वर्धा जिल्हाधिकारी आणि सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक आदी विविध पदे भूषविली आहेत.

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची सह आयुक्त वस्तू व सेवा कर छत्रपती संभाजी नगर या पदावर नियुक्ती झाली आहे. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत गेल्या अडीच वर्षापासून नांदेड येथे जिल्हाधिकारी पदावर होते. ३० सप्टेंबर २०२२ रोजी ते नांदेड येथे जिल्हाधिकारी पदावर रुजू झाले होते.विविध जन उपयोगी उपक्रम ,सामान्य जनतेशी थेट संपर्क ठेवणारे अधिकारी, उत्कृष्ट प्रशासक म्हणून अभिजीत राऊत यांची कारकीर्द कायम स्मरणात राहणारी आहे.

# गझल ही जीवन कसे जगावे हे शिकवते ज्येष्ठ गझलकार डॉ.गणेश गायकवाड

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

गझल ही जीवन कसे जगावे हे शिकवते असे मत ज्येष्ठ उर्दू व मराठी गझलकार डॉ. गणेश गायकवाड यांनी दोन दिवसीय अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलनाचा समारोप करताना व्यक्त केले.आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या समारोपीय सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे माजी सभापती राजेसाहेब देशमुख तर अध्यक्ष म्हणून संमेलनाचे अध्यक्ष डॉ. दिलीप पांढरपट्टे हे उपस्थित होते. व्यासपीठावर स्वागताध्यक्ष दगडू लोमटे, डॉ. शुभदा लोहिया, गोरख शेंद्रे, सुनील जाधव हे उपस्थित होते. आपल्या विस्तारीत भाषणात डॉ. गणेश गायकवाड यांनी मराठी उर्दू गझलांचे संदर्भ देत महाराष्ट्रात गझल ही कशी समृध्द होत गेली ते सांगितले. गझलेची सुरुवात ही उर्दू भाषेत झालेली असली तरी आता मराठी गझल ही खुप आशयघन झाली असून उर्दू गझलापेक्षाही ती खुप पुढे गेली असल्याचे सांगितले. गझल लेखन करण्यापुर्वी गझलकारांनी जुन्या उर्दू आणि मराठी गझलकारांनी लिहिलेल्या गझलांचा अभ्यास करणे हे खुप आवश्यक असल्याचे सांगत गझलेला आशयघन आणि समृध्द बनवण्यासाठी गझलेतील प्रत्येक शेर हा ताकदवान झाला पाहिजे असे त्यांनी सांगितले. आपल्या भाषणात डॉ. गणेश गायकवाड यांनी आपला मराठी आणि उर्दू गझलांचा प्रवास कसा सुखकर झाला, उर्दू गझला लिहिण्यापुर्वी आपण उर्दू भाषा कशी आत्मसात केली हे सांगत त्यांनी आपल्या अनेक मराठी आणि उर्दू गझला पेश केल्या.महाराष्ट्रात सुरु झालेला मराठी आणि उर्दू गझलांचा हा एल्गार अधिक सशक्त करण्यासाठी हे दुसरे अखिल भारतीय एल्गार मराठी गझल संमेलन अत्यंत प्रभावी आणि आशादायी ठरणार असून या संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबध्दल त्यांनी साधना सेवाभावी संस्थेचे सचिव दगडू लोमटे आणि त्यांच्या सर्व सहका-यांचे मनापासून कौतुक केले. या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून बोलताना राजेसाहेब देशमुख यांनी साधना सेवाभावी संस्थेचे वतीने अंबाजोगाई शहरात गझलांचा हा दोन दिवसीय दरबार अंबाजोगाईत घेतल्याबद्दल संयोजक दगडू लोमटे यांचे कौतुक करून गझलेचे सामान्य माणसाच्या आयुष्यात किती महत्त्व आहे हे अनेक उदाहरणे देत सांगितले. यापुढे गझलेल्या कोणत्याही कार्यक्रमाला आपण मनापासून सहकार्य करु असे सांगितले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या साक्षीने सुरेश धस यांच्या भगीरथ प्रयत्नातून साकारणार खुंटेफळ साठवण तलाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

आष्टी तालुक्यातील कायमस्वरूपी दुष्काळाने शेतकरी शेतमजूर यांच्या हालअपेष्टा अनुभवलेल्या आ.सुरेश धस यांनी राजकीय कारकिर्दीची सुरुवातच या कष्टकरी शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये चांगले दिवस येण्यासाठी कायमस्वरूपी सिंचनासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे या ध्येयाने राजकारणात उतरलेल्या आ.सुरेश धस यांनी खुंटेफळ साठवण तलाव पूर्ण करण्याचे ध्येय समोर ठेवून अथक परिश्रम केले असल्याने त्यांच्या या भगीरथ प्रयत्नांना यश आले असून आज महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते थेट जलवाहिनी कामाच्या बोगदा कामाचा शुभारंभ करण्यात येणार आहे यावेळी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, राज्याचे जलसंपदा मंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह बीड जिल्ह्यातील खा. बजरंग सोनवणे, आ.प्रकाश सोळंके आ.नमिता मुंदडा आ.संदीप क्षीरसागर आ.विजयसिंह पंडित पाथर्डीच्या आमदार मोनिकाताई राजळे उपस्थित राहणार आहेत खुंटेफळ साठवण तलावाची मंजुरी सन २० १४ मध्ये मिळाली परंतु मधल्या कालावधीमध्ये पर्यावरणाची परवानगी न मिळाल्यामुळे तलावाचे काम बंद होते परंतु सन २०१८ मध्य सुरेश धस विधान परिषद सदस्य झाले आणि या कामाला पुन्हा गती मिळाली त्यांनी तत्कालीन खा.प्रीतम मुंडे यांचे बरोबरीने केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या समवेत केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाची परवानगी मिळवली आणि या रखडलेल्या कामाला संजीवनी मिळाली आणि काम सुरू झाले परंतु खुंटेफळ साठवण तलावामध्ये भूसंपादित झालेल्या गावांचे पुनर्वसन आणि इतर काहीही कार्यवाही न झाल्यामुळे अखेर सुरेश धस २०२४ विधानसभा निवडणुकीमध्ये प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्यानंतर या कामाने भरारी घेतली असून नोव्हेंबर २०२४ पासून आजवर २० टक्के पेक्षा ज्यादा काम झाले असून आमदार सुरेश धस यांची कामाची



धडाडी आणि पाठपुरावा आणि या तलावाच्या बारीक-सारीक तांत्रिक माहिती असल्यामुळे या तलावाच्या कामाने गती घेतल्या असून शासनाने देखील पुरेसा निधी उपलब्ध करून दिला असून मध्यंतरी झालेल्या विधानमंडळ अधिवेशनामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक रकमे ३०० कोटी रुपये या तलावाच्या कामासाठी निधी मंजूर करून या तलावाच्या पूर्णत्वाविषयी संकेत दिलेले आहेत आ.सुरेश धस यांनी त्यांच्या राजकीय जीवनातील सर्वात महत्त्वाकांक्षी असलेला हा प्रकल्प असून त्यांनी या प्रकल्पासाठी मुख्यमंत्र्यांनी उपस्थित राहावे यासाठी प्रयत्न केल्याने अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज या कार्यक्रमासाठी येत आहेत कृष्णा खोरे अंतर्गत असलेल्या या कृष्णा मराठवाडा योजनेअंतर्गत असलेल्या आष्टी सिंचन योजना क्रमांक तीन म्हणजे खुंटेफळ साठवण तलाव हा असून एकूण १.६८ टीएमसी पाणी आणि मराठवाड्याच्या हक्काचे संभाव्य चार टीएमसी पाणी येईल उपलब्ध होणार हे गृहीत धरून तलावाचे काम सुरू असून २८०१ कोटी रुपये किंमत असून २६ गावातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार असून त्याद्वारे २० हजार एकर शेतीला पाणी मिळणार आहे आणि आणखी ४ टीएमसी पाणी मंजूर झाल्यास त्या खुंटेफळं साठवण तलावातून आष्टी तालुक्यातील इतर तलावांमध्ये हे पाणी वितरित करण्यात येणार असल्यामुळे संपूर्ण आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये समाधान पसरले असून आमदार सुरेश धस यांच्या या भगीरथ प्रयत्नामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उपस्थित होणाऱ्या या कार्यक्रमासाठी सुमारे एक लक्ष जनसमुदाय उपस्थित राहणार असून त्यासाठी ६५ हजार खुर्च्यांची सोय करण्यात आली असून महिला वर्गांनी देखील या कार्यक्रमासाठी यावे याचे नियोजन करण्यात आले आहे या भव्य दिव्य अशा या नियोजनामुळे हा कार्यक्रम यशस्वी होईल असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला आहे.

# शिरूर येथील सौर ऊर्जा प्रकल्पाच्या विरोधात शेतकऱ्यांचे आंदोलन

## कंपनीने आर्थिक व्यवहार फसवणुकीचा करून २२ शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्या

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी । महेश पडोळे**

उमरी तालुक्यातील मौजे शिरूर येथे सन २०२३ते २०२४ मध्ये वेस्टर्न अँड फोर्स प्रायव्हेट लिमिटेड इंडिया ह्या सौर ऊर्जेच्या कंपनीची उभारणी करण्यासाठी कंपनीचे एजंट दीपक शंकर नलवाडे मु. पो. जखिनवाडी तालुका कराड. जि सातारा. यांनी शिरूर येथिल शेतकऱ्याची जमीन प्रति एकर १० लाख रुपये प्रमाणे ऊर्जा प्रकल्पासाठी विकत घेऊ व कुटुंबातील एका व्यक्तीला कंपनीमध्ये रोजगार देऊ असे शिरूर येथील शेतकऱ्यांना आश्वासन दिले त्यांच्या या बोलण्यावर विश्वास ठेवून तेथील २२ शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी या सौर ऊर्जा प्रकल्पास दिल्या दिल्यावर त्या ठिकाणी प्रकल्प उभारणी करण्यात आला.पण याच कंपनीचे एजंट दीपक शंकर नलवाडे, नितीन भाऊसाहेब जाधव , निलेश लक्ष्मण गायकवाड यांनी शेतकऱ्याची दगाफटका केला व जमिनीची रजिस्ट्री मात्र चार लाख ५० हजार प्रमाणे करून शेतकऱ्यांची फसवणूक केली. उर्वरित पाच लाख ५० हजार रक्कम मागण्यास कंपनीमध्ये गेल्यास कंपनीचे एजंट अरेरावेची भाषा करून जीवे मारण्याची धमकी त्या शेतकऱ्यांना देत असल्याचे तेथील शेतकरी आपल्या तोडून सांगत आहेत. या सर्व बाबी बद्दल तेथील शेतकऱ्यांनी तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले आहे. कंपनीच्या मालकावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून ऊर्जा कंपनी बंद करण्यात यावे यासाठी शेतकरी उमरी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसले आहेत . ऊर्जा कंपनीस जमीन विकणारे शेतकरी खालील प्रमाने नामे



१)केरबा मारुती उसेवाड,२शेषाबाई मारुती उसेवाड ३दत्ता केरबा उसेवाड,४ जनाबाई दत्ता उसेवाड,५ आनंदा करबा उसेवाड ६पंढरी तुकाराम वंगलवार,७ दिगंबर गणपती खतगाये, ८लिंगराम गणपती खतगाये, ९शिवराज दिगांबर खतगाये १०पुंडलिक सखाराम कोंडेवाड ११कौशल्याबाई मारुती कोंडेवाड १२मारुती पुंडलिक कोंडेवाड१३ १४रेखाबाई कोंडीबा कोंडेवाड १५सुरेखाबाई नारायण रोडेवाड १६माधव दिगंबर हुसेवाड १७शेषाबाई माधव चोपवाड ,१८गंगाधर लक्ष्मण डुबुकवाड, १९संतोष लक्ष्मण डुबुकवाड, २०आनंदीबाई मारुती डुबुकवाड, २१वंदनाबाई रत्नाकर बिरदे, २२जयशिला संदिप बिरदे या शेतकऱ्यांनी आपल्या उदरनिर्वाहाचे साधन असलेली आपली जमीन दीपक शंकर नरवाडे यांच्या खोट्या आश्वासनास बळी पडून आपली जमीन विकली व सदर जमीन विकण्यास ज्यांनी प्रवृत केले ते एजंट १नितीन भाऊसाहेब जाधव ,२ निलेश लक्ष्मण गायकवाड, ३दीपक शंकर नरवाडे यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करून यांना तात्काळ अटक करण्यात यावी यासाठी शिरूर येथील शेतकऱ्यांनी आमरण उपोषणास उमरी तहसील कार्यालय बसले आहेत. त्यांच्या अर्जाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन दोषींवर कारवाई करण्याची मागणी निवेदाद्वारे प्रशासनाकडे केली आहे.

# ग्रामीण रुग्णालय भोकर येथे जागतिक कर्करोग दिन साजरा




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकर । रमाकांत जोशी**

०४/०२/२०२५ रोजी मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निळकंठ भोसीकर, मा. अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय पेरके ,नोडल अधिकारी.डॉ. हनुमंत पाटील,जिल्हा मौखिक आरोग्य अधिकारी डॉ.कांतीलाल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच ग्रामीण रुग्णालय भोकर येथील वैद्यकीय अधिक्षक डॉ.प्रताप चव्हाण सर यांच्या निरीक्षणाखाली ग्रामीण रुग्णालय भोकर येथे जागतिक कर्करोग दिन साजरा करण्यात आला. यावेळी दंत शल्य चिकित्सक डॉ. मायादेवी नरवाडे यांनी बाह्य रुग्ण विभागात आलेल्या रुग्णांना मौखिक कर्करोगाविषयी माहिती दिली त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना सांगितल्या तसेच या वर्षाचे घोष वाक्य णपळीं षी णपळींशिं म्हणजेच एकजूट होऊ या व कर्करोगाला हरवू या ही घोषवाक्य सांगितले व सर्व रुग्णांची मौखिक तपासणी केली. यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता भालके मॅडम, एनसीडी वैद्यकीय अधिकारी डॉ. सागर रेड्डी, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी बालाजी चांडोलकर, औषध निर्माण अधिकारी शिवप्रसाद जाधव, दंत सहाय्यक करण शिंदे, एनसीडी समुपदेशक रेणुका भिसे, भालेराव सिस्टर, श्रीमती करंडेकर आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# गड कायम देशमुख कुटुंबाच्या पाठीशी–महंत नामदेव शास्त्री!

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

–मी कधीही कोणत्याच आरोपीची पाठराखण केलेली नाही, करणार देखील नाही, उलटपक्षी भगवानगड देशमुख कुटुंबाच्या पाठीशी कायम राहील. आरोपीना फाशी व्हावी हीच आपली भूमिका आहे असे मत भगवानगडाचे महंत नामदेव शात्री यांनी व्यक्त केले. संतोष देशमुख कुटुंबाने रविवारी शास्त्री यांची भेट घेतली.नामदेव शास्त्री यांनी दोन दिवसापूर्वी धनंजय मुंडे यांच्या पाठीशी गड असल्याचे म्हटले हॉटेल. त्यानंतर महाराष्ट्रात खळबळ उडाली.
दरम्यान आपली बाजू समजावून सांगण्यासाठी आज देशमुख कुटुंबिय गडावर पोहचले. त्यांनी महंतांची भेट घेतली. त्यांनी संतोष देशमुख यांच्या खूनामागील खरं कारण, आरोपींचा पूर्व इतिहास, त्यांची गुंडगिरी, खंडणीचे प्रकार, त्यांच्यावरील गुन्ह्यांचा कच्चाचिठ्ठाचा महाराजांपुढे मांडला. आरोपींच्या गुन्ह्याचा पाढा वाचून संतोष देशमुख यांचे काय चुकले असा प्रश्न केला. धनंजय देशमुख यांच्या आर्त हाक नामदेव शास्त्री यांनी ऐकली. त्यांनी लागलीच भगवानगड हा देशमुख कुटुंबियांच्या पाठीशी असल्याचे जाहीर केले.यावेळी देशमुख कुटुंबाने कधीच जातीवाद केला नाही, असे धनंजय देशमुख यांनी सांगितले. देशमुख कुटुंबियांची जमीन मुंडे कुटुंब दोन पिढ्यांपासून कसत आहे, त्याची माहिती त्यांनी महंतांना दिली. प्रामाणिकपणे सांगतो. मनोहर मुंडेंचे चार मुले होते. दोन मुले पुण्यता होते. दोन मुले इथे. त्यांनी जे पिकवलं ते आम्ही खातो. देशमुख कुटुंबाने जातीवाद केला असता तर त्याच्या हत्येनंतर दिसलं असतं. दलित बांधावाला वाचवण्यासाठी गेला. असे धनंजय देशमुख म्हणाले.
आमची कोणतीही गुन्हेगारी नाही. १५ वर्ष सरपंच राहिलेल्या माणसाशी या लोकांनी संपर्क साधायला हवा होता. आरोपींवर आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. आरोपींची मानसिकता तपासण्याची गरज आहे. ज्याला आरोपींची बाजू घ्यायची त्यालाच जातीयवादाचा अंश येत आहे. आम्ही सर्व दाखवलं आहे. यांच्या कार्यालयात बसायचे. त्यांच्या गाडीत फिरायचे, असे देशमुख म्हणाले.हा न्यायाचा लढा आहे. अतिशय क्रूर हत्या झाली आहे. प्रत्येक क्षेत्रातील लोक आपल्यासोबत आहे. राजकीय नेते, संप्रदायाचे लोक आहेत, सामाजिक कार्यकर्ते आहेत, ते आमच्यासोबत आहेत. न्यायाच्या भूमिकेत आहेत. अशावेळी लोकप्रतिनिधींना जातीयवादी म्हणू नका. नाही तर ते कोणत्याच न्यायाच्या भूमिकेत येणार नाही. न्याय मागणाऱ्या लोकप्रतिनिधींना चुकीचं ठरवू नका, अशी विनंती धनंजय देशमुख यांनी केली.भगवान बाबाला मानणारं कुटुंब आहे. जातीय सलोखा या गावात होतं. यापूर्वी किती वेळा गडावर आले हे त्यांनी दाखवलं. भगवान गड तुमच्या पाठी कायम राहील ही ग्वाही देतो, असे वक्तव्य नामदेव महाराजांनी केले. भगवान गडाला मानणारं कुटुंब आहे. यापूर्वी ते गडावर येत होते. आरोपींची पार्श्वभूमी असलेले पुरावे त्यांनी दिले आहेत. धनंजय यांचं म्हणणं आहे की, याला जातीयवादाचं स्वरुप देऊ नका,. भगवान गड कायम स्वरुपी देशमुख कुटुंबाच्या पाठी उभं राहील. आरोपींची खरी पार्श्वभूमी काय आहे, त्यांच्यावर गुन्हे किती आहे, ते त्यांनी दाखवलं.संतोष अण्णाने किती काम केलं हे त्यांनी दाखवलं. ते मूळचे बाबाचे आहेत. हे आज कळालं. त्यांची जमीन तीन पिढ्यांपासून वंजारी कुटुंब करत आहे. जातीयवाद न करता खऱ्या आरोपीला शिक्षा व्हावी हे गादीवरून सांगणं आहे. आम्ही बसून बोलू. त्यांना दोन घास खाऊ घालू. त्यांना प्रसाद देऊ. संतोष देशमुख यांच्या आत्म्याला शांती मिळेल, असे महंत म्हणाले

# बिबट्याचा हल्ला एक जन जखमी परिसरात दहशतीचे वातावरण

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

रविवार दिनांक २ रोजी शेडगाव येथील रहिवासी असलेले सलीम झेंडे गावच्या आठवडा बाजार उरकून आपल्या दुचाकीवरून वस्तीकडे जात असताना अचानक बिबट्या ने हल्ला केला बिबट्या च्या हल्ल्यात सलीम झेंडे यांच्या पँटचा तुकडा बिबट्या च्या तोंडात तुटुन गेल्याने ते बालबाल बचावले आहेत श्री झेंडे यांच्या पायावर बिबट्या चे नखे लागल्याने त्यांना उपचारासाठी शासकीय ग्रामीण रुग्णालय आढळगाव येथे दाखल केले असता झेंडे यांना रुग्णालयात लस देवुन घरी पाठवण्यात आले आहे ते सध्या खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत शेडगाव टाकळी पेडगाव ग्रामस्थांनी वेळोवेळी वन विभागच्या अधिकार्यांना माहिती देऊन ही वनविभागाने कसलीही तत्परता दाखवली नाही आज दै लोकनेता चे प्रतिनिधी ज्ञानेश्वर येवले यांनी वनखात्याच्या अधिकार्यांसी संपर्क साधला असता पिंजरा तातडीने लावण्याचे आश्वासन दिले आहे परंतु पिंजरा आणण्यासाठी वनविभागा कडे वाहनं उपलब्ध नाही ज्या गावात पिंजरा लावायचा आहे त्या गावच्या सरपंचांनी वाहन उपलब्ध करून देण्याचे वनविभागा कडुन सांगण्यात आले आहे
गेल्या दोन दिवसात अनेक ठिकाणी बिबट्याचे दर्शन झाले आहे परिसरात दहशतीचे वातावरण निर्माण झाली असून वन विभाग याकडे का दुर्लक्ष करीत आहे असा सवाल सर्वसामान्य जनतेला पडत आहे
जर पिंजरा आणण्यासाठी वनविभागा कडे वाहनं उपलब्ध नसेल तर ही वनविभागाची मोठी शोकांतिका आहे वनविभागाला पिंजरा ने आन करण्यासाठी तालुक्यांचे लोकप्रतिनिधी युवा आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी लक्ष घालून वनविभागाला पिंजरा वाहतूक करण्यासाठी एक वाहन उपलब्ध करून देण्याची मागणी शेडगाव टाकळी पेडगाव परीसरातील जनतेमधून होत आहे .



आपल्या सेवेत श्री रेणुकाई पेट्रोलियम अधिकृत विक्रेते हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड आज दिनांक ४.०२.२०२५ या शुभ मुहूर्तावर श्री रेणुकाई पेट्रोलियम चे उद्घाटनप्रसंगी चंद्रशेखर देशमुख, नंदकिशोर देशमुख व श्री रेणूकाई पेट्रोलियम साठी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देताना सौ.आशाताई पांडे, जिल्हा परिषद ,सदस्या राजेंद्र देशमुख, आकाश पांडे, मनोज देशमुख, गंभीर पवार, नारायण सोरमारे, गणेश पवार, शंकर मयुरे,दैनिक लोकनेता चे भोकरदन तालुका पत्रकार राम शिंदे, यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

# वादग्रस्त सायफळ वाळू घाट काढला खोदून

## नायब तहसीलदार कैलास जेठे यांची रात्रीला कारवाई

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीक्षेत्र माहूर । राजकिरण देशमुख**

माहूर तालुक्यातील पैनगंगा नदी पात्रावर अतिदुर्गम भागात असलेल्या मौजे सायफळ वाळू घाटावरून वाळू चोरी होत असल्याच्या वावड्या उठवून नायब तहसीलदार तथा महाकाल नावाने प्रसिद्ध झालेले कैलास जेठे यांचे विरुद्ध वाळू तस्करांनीच विनाकारण सोशल मीडियावर मजकूर टाकून विनाकारण बदनामी करण्याचा प्रयत्न केल्याने तहसीलदार किशोर यादव यांच्या आदेशाने नायब तहसीलदार कैलास जेठे यांनी रात्रीला जाऊन तो वादग्रस्त सायफळ वाळू घाट जेसीबीने खोदून काढत बेल पत्र वाहून आल्याने पुन्हा एकदा त्यांच्या धडक कारवाईची वाळू तस्करांनी धास्ती घेतल्याचे दिसत आहे
वाईबाजार परिसरातील वाळू तस्करीत अप्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या काही मंडळींनी नायब तहसीलदार उर्फ महाकाल नावाने अर्ध्या रात्री कारवायासाठी प्रसिद्ध असलेले कैलास जेठे यांनी कारवाया करू नये म्हणून सोशल मीडियावर विनाकारण वावड्या उठवत सायफळ वाळू घाटा वरून वाळू चोरी होत असल्याच्या पोस्ट टाकत कारस्थान रचून बदनामी सुरू केली होती यामध्ये काही पांढरपेशा तस्करांचाही हात होता परंतु कैलास जेठे यांनी बदनामीला भीक न घालता




रजेवरून हजर होताच तात्काळ सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तहसीलदार किशोर यादव यांच्या आदेशानुसार तडक सायफळ घाट गाठत जेसीबी द्वारे संपूर्ण घाट रात्रीलाच खोदून काढल्याने तस्करांनी त्यांच्या या धडक कारवाईची जास्ती घेतल्याचे दिसत आहेसहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली तहसीलदार किशोर यादव हे वाळू तस्करांच्या मुळावर उठल्याने वाळू तस्करी जवळपास बंद झाली असून यामुळे मात्र वाळू तस्करांचा आणि त्यांच्या पाठीराख्यांची आग होऊन महसूल विभागाच्या कारवाईच्या विरोधात सोशल मीडियावर काही चमच्यांनी बदनामीकारक मजकूर टाकून महसूल विभागाचे लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न सुरू केला होता परंतु महसूल विभागाने वाळू तस्कर विरोधात धडक कारवाया सुरू ठेवल्याने वाळू तस्करांचे व पांढरपेशा पाठीराख्यांचे पित्त खवळून उलट सुलट वावड्या उठवल्या गेल्याने महाकाल उर्फ नायब तहसीलदार पुन्हा महाकालच्या रूपात थेट सायफळ घाट गाठून त्यांनी घाट खोदून काढल्याने वाळू तस्करांची पंढरी घाबरली असून वाळू तस्करीत एखाद्या ट्रॅक्टर टिप्पर चालकाचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष सहभाग आढळून आल्यास त्याचे घरूनही ट्रॅक्टर जप्तीची कारवाई करण्यात येईल असा कडक तहसीलदार किशोर यादव महाकाल उर्फ गायब तहसीलदार कैलास जेठे यांनी दिला आहे यावेळी सोबत पोलीस पाटील हेमंत गावंडे पाटील महसूल सेवक पवन पाटील सोबत होते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904